# माहितीचा अधिकार
## अधिनियम, २००५




**मोहन गवस**

माजी प्रशासकीय अधिकारी

- सल्लागार – सिडको नवी मुंबई
- सल्लागार – विभागीय चौकशी

# माहितीच्या अधिकाराचा हक्क म्हणजे काय?


- शासन आपली कतर्व्य व्यवस्थित पणे पार पाडत असल्याचे खात्री करता येते.
- सर्व सामान्य नागरीकाला माहिती मिळविण्याचा हक्क प्राप्त होतो.
- स्वच्छ कारभार व गतीमान प्रशासन यास चालना मिळते.
- व्यापक जनहित हा माहिती मागण्यामागचा उद्देश असावा.

# माहिती मिळविण्याची कार्यपध्दती

- विहीत नमुन्यातील अर्ज जनहित माहिती अधिका-याकडे सादर करावा.
- अर्जात अर्जदाराचे पुर्ण नाव व पत्ता, मोबाईल क्रमांक नमुद करावा.
- ज्या विषयाची माहिती हवी असेल तो विषय लिहावा.
- हव्या असलेल्या माहितीचा कालावधी नमुद करावा.
- माहिती पोष्टाने पाठवावी की वैयक्तिक नेणार.
- पोष्ट खर्च अर्जदारास भरावा लागतो.

- अर्जावर कोर्टफी स्टॅम्प लावावा (रुपये १०/-).
- अर्ज केल्याची तारीख व ठिकाण लिहावे व त्याखाली सही करावी.
- दारिद्र रेषेखाली  फी भरावायाची अवश्यकता नाही.
- अर्ज देवून पोहोच घ्यावी.
- अर्ज स्विकारण्याचे अधिकार सहाय्यक माहिती अधिकारी यांना आहे.

# अर्जावर कारवाई




- अर्ज प्राप्त झाल्यावर जनमाहिती अधिकारी रजिस्टरवर नोंद घेईल.
- अर्जास पोच देईल.
- ३० कामाच्या दिवसांपेक्षा जास्त नसेल अशा रीतीने माहिती पुरवेल.
- ३० दिवसांपेक्षा जास्त कालावधी लागणार असेल तर तसेही ३० दिवसाच्या आत अर्जदारास कळवावे.
- अन्यथा जनमाहिती अधिकारी माहिती देण्यास टाळाटाळ करतो असे समजावे.

# जनमाहिती अधिकारी यांचा अर्जावरील निर्णय

- जनमाहिती अधिकारी अर्जावर खालील  मुद्यावर अर्जदारास निर्णय कळवील.
- मागणी फेटाळण्यामागील कारणे.
- मागणी फेटळण्याविरुध्द किती कालावधीत अपील करावे.
- अपीलीय अधिकारी व त्याचा पत्ता.
- अपील करण्याची मुदत ३० दिवस.
- राज्य माहिती अधिका-याकडे अपील करण्याची मुदत ९० दिवस
- अपीलावर ४५ दिवसात निर्णय घेणे बंधनकारक
- अपील अर्जावर स्टॅप रुपये २०/-

# माहिती उघड करण्यातून सूट

- भारताचे सार्वभौमत्व, एकात्मता, सुरक्षीतता, हित, विदेशी संबंध यांना बाधा निर्माण होईल अशी माहिती
- एखाद्या अपराधास चिथावणी मिळेल अशी माहिती
- न्यायालयाकडून किंवा न्यायाधीकरणाकडून मनाई करण्यात आलेली आहे किंवा त्यामुळे न्यायालयाचा अवमान होत असेल अशी माहिती
- संसदेच्या अथवा राज्यविधान मंडळाच्या विषेशाधिकारांचा भंग होत असेल
- वाणिज्य, व्यापार बौधीक संपदा यांच्या गुपीतांना, स्पर्धात्मक स्थानांना हनी पोहोचेल.

- एखाद्या व्यक्तिच्या संबंधांना हनी पोहोचेल
- सेवा अभिलेखा संबंधीत माहिती
- विदेशी सरकार किंवा आंतरराष्ट्रीय संघटना यांच्याकडून प्राप्त असलेली गुप्त माहिती
- जिच्यामुळे कोणत्याही व्यक्तीचे जिवन किंवा सुरक्षीतता धोक्यात येईल किंवा कायद्याच्या अंमल बजावणीसाठी गुप्त पणे दिलेल्या माहितीचे सुत्र ओळखता येईल
- शासकीय गुपीते अधिनियम १९२३ अन्वये उघड करण्यास मनाई केलेली आहे.

- गुन्ह्याचा तपास, आरोपास अटक किंवाखटला दाखल करण्यास अडथळा येईल.
- जिचा सार्वजनिक कामकाजाशी किंवा हितसंबंधाशी संबंध नसेल किंवा व्यक्तीच्या खाजगीपणाचे उल्लंघन होईल.
- जी माहिती उघड करणे व्यापक लोकहीताच्या दृष्टीने आवश्यक आहे अशी सक्षम प्राधिका-याची खात्री पटली नसेल.

# विवक्षित प्रकरणात माहिती देण्यास नकार देण्याची कारणे

- जेव्हा माहिती आधिच राजपत्रात किंवा अन्यत्र प्रसिध्द झालेली असेल.
- माहिती संस्करण करणे, ती मिळवणे यासाठी मोठ्या प्रमाणात शासकिय प्राधिकरणाच्या साधन सामगीचा प्रमाणाबाहेर वापर करावा लागेल.
- जेव्हा अशी माहिती संबंधीत कायदा, नियम या द्वारे विशिष्ठ वेळी  प्रसिध्द करणे आवश्यक असेल.

# माहितीचा अधिकार अधिनियम २००५
## महत्वाच्या तरतूदी

- व्याप्ती – (कलम-२)
  – शासकिय, निमशासकिय कार्यालये, शासनाच्या नियंत्रणाखालील सार्वजनिक प्राधिकरणे सामावेश करण्यात येतो.

- माहिती - (कलम-२ (फ))
  – माहितीमध्ये खालील बाबींचा सामावेश होतो
  – कोणत्याही  स्वरुपातील साहित्य
  – अभिलेख, दस्तऐवज, ज्ञापने, इ-मेल, अभिप्राय, सुचना, प्रसिध्दी पत्रके, आदेश, रोजवह्या, संविदा, अहवाल, कागदपत्रे, नमुने, मॉडेल, इलेक्ट्रोनीक स्वरुपातील माहिती.

It's My Right

- टिप –
  - या व्याखेत का या प्रश्नांची उत्तरे सामाविष्ठ नाहीत
  - अमुक एखादी विशिष्ठ गोष्ट का करण्यात आली व का करण्यात आली नाही त्याची कारणे माहिती अधिका-याने करणे अपेक्षित नाही.

**(२००८(०४) All Maharashtra Law Reporter ५८६)**

# महितीच्या हक्कांमध्ये पुढील हक्कांचा समावेश होतो

१. सर्व नागरिकांना माहितीचा हक्क आहे. (कलम ३)
२. माहितीच्या हक्कामध्ये पुढील हक्कांचा समावेश होतो.
    १. एखादे काम, दस्तऐवज,अभिलेख यांची पाहणी करणे.
    २. दस्तऐवजांच्या किंवा अभिलेखांच्या टिपण्या, उतारे किंवा प्रमाणित प्रती घणे.
    ३. साधनसामग्रीचे प्रमाणित नमुने घेण्याचा
    ४. डिस्केट, फ्लॉपी, टेप, व्हिडीओ कॅसेट या स्वरुपातील किंवा अन्य कोणत्याही इलेक्ट्रोनिक प्रकरणातील माहिति किंवा जेव्हा अशी माहिती संगणकात किंवा अन्य कोणत्याही उपकरणात साठवलेले असेल त्या बाबतीत मुद्रित प्रतीतून माहिती मिळविणे.

३. माहिती मिळविण्यासाठी इंग्रजी, हिंदी किंवा त्या क्षेत्राच्या राजभाषेत अर्ज करण्याचा हक्क (कलम ६(१))

४. माहितीचा अर्ज भरता येत नसेल तर, त्या कामी, माहिती अधिका-याची मदत घेण्याचा हक्क (कलम ६(१))

५. जर मागितलेली माहिती अन्य सार्वजनिक प्राधिकरणाशी संबंधित असल्याने अर्ज अन्य प्राधिकरणाकडे हस्तांतरित केला असेल तर, अशा हस्तांताणाबाबत अर्जदारास तात्काळ कळविले  पाहिजे (कलम ६(३))

६. माहिती  मिळविण्यासाठी येणारा खर्च, वेळेत अर्जदारास कळवला पाहिजे (कलम ६(३)(ब))

७. विकलांग अर्जदारास अभिलेखाची माहिती मिळविण्यामध्ये व ती पाहण्यामध्ये माहिती अधिकाऱ्याने मदत केली पाहिजे (कलम ७(४))

८. दारिद्र्य रेषेखालील अर्जदारास, माहितीच्या फीमधून सूट मिळण्याचा हक्क (कलम ७(५))

९. सार्वजनिक प्राधिकरणाने विहित मुदतीत माहिती पुरविली नाही तर, माहिती मोफत मिळण्याचा अर्जदारास हक्क आहे. (कलम ७(६))

१०. माहिती नाकारण्याची  कारणे, किती कालावधीत अपील केले पाहिजे तो कालावधी व अपील प्राधिका-याचा तपशील अर्जदारास कळविणे अनिवार्य आहे. (कलम ७(८))

११. राज्य माहिती आयोगाकडे किंवा केंद्रिय माहिती आयोगाकडे तक्रार दाखल करण्याचा अर्जदारास अधिकार आहे. पुढील प्रकरणी अशी तक्रार दाखल करता येते.




# माहितीचा अधिकार आणि  सार्वजनिक प्राधिकरणांवरील आबंधने

- शासकीय माहिती अधिका-याकडे/सहायक माहिती अधिका-याकडे विनंतीअर्ज करण्यात असमर्थ ठरल्यास (कलम १८(१)(अ))
- मागितलेली माहिती मिळण्यास नकार दिल्यास (कलम १८(१)(ब))
- माहिती मिळण्याच्या मागणीस विहित मुदतीस प्रतिसाद न दिल्यास (कलम १८(१)(क))

- अवाजावी फी भरण्यास भाग पाडल्यास (कलम १८(१)(ड))
- अपुरी, दिशाभूल करणारी किंवा खोटी माहिती देण्यात आल्यास (कलम १८(१)(इ))
- अभिलेख मिळविता येणा-या कोणत्याही बाबीवरील माहिती मिळण्यासाठी (कलम १८(१)(इ))

राज्य माहिती आयोग किंवा केंद्रिय माहिती आयोग, तक्रारीच्या कारणांच्या वालवीपणाविषयी खत्री पटल्यास तक्ररीची चौकशी करील. अशी चौकशी करताना माहिती आयोगास, दिवाणी न्यायालयाप्रमाणे अधिकार असतील.

१२. एखाद्या व्यक्तीचे जीवीत वा स्वतंत्र्य यासंबंधातील माहिती  अर्ज केल्यापासून ४८ तासांच्या आत, मिळण्याचा हक्क आहे. (कलम ७(१))

१३. कलम ८अन्यवे उघड न करण्यातून सूट असलेल्या माहितीच्या विभागातून उघड करण्याजोगी माहिती वेगळी (पृथक) करुन मिळण्याचा हक्क आहे. (कलम १०(१))

१४. त्रयस्थ पक्षाला होणारी हानी किंवा क्षती यापेक्षा माहिती उघड करणे लोकहितार्थ महत्वाचे असेल तर, त्रयस्थ पक्षाची माहिती मिळण्याचा हक्क आहे (कलम ११(१))

१५. वाजवी कारणावरुन विहित मुदतीत अपील करता आले नाही तर, मुदतीनंतर अपील दाखल करुन घेण्याचा हक्क (कलम १९).

# महाराष्ट्र शासन सा प्र वी परीपत्र क्रमांक संकिर्ण २०१२/९८९/प्रक्र. ४७९/०६/१७/१०/२०१४



# माहिती नाकारण्या संदर्भात तरतूदी

- खालील माहिती नाकारता येण्यासारखी आहे

१. शासकिस कर्मचा-यास त्याच्या सेवा कालावधीत मिळालेल ज्ञपन, कारणे दाखवा नोटीस, शिक्षेचे आदेश.

२. त्याच्या सेवानियमा अतर्गत कामगीरीचा अहवाल.

३. त्याच्या  चल-अचल संपत्ती बाबतची माहिती.

४. त्याने केलेले आर्थिक गुनतवणूक बॅक किंवा वित्तीय संस्थाकडून घेतलेली कर्जे

५. मुलाच्या विवाहाच्या वेळी मिळालेल्या भेट वस्तू

६. आयकर विवारण पत्रे

७. वैयक्तिक तपशीला बाबतची अन्य माहिती

८. जी माहिती विस्त्रत स्वरूपाची आहे अशी माहिती

# माहिती गहाळ होणे/ मिळून न येणे या संबंधी तरतूदी

- मेसर्स मिशा सिह विरूध्द. पर्यावरण व वन मंत्रालय, अपील क्रमांक CIC/AT/A/२००६/२० दिनांक २३ मार्च २००६ अन्वये माहिती आयोगाने असा निर्णय दिला की फाईल मिळून येत नसेल किंवा गहाळ झाल्या असतील तर चोरीस/नुकसानीस जे जबाबदार असतील त्यांच्या विरुध्द फौजदारी कारवाई सुरू करावी. FIR दाखल करावा

# फाईल मधील नोटींग देता येईल काय?

- माननिय केंद्रिय माहिती आयोगाने दिनांक २३ जुन २००९ रोजी अंतिम निर्णय दिला की माहिती अधिकार कायद्याच्या कलम ८ खाली माहिती उघड करण्यातील अपवाद नसतील तर अशी फाईल नोटींग उघड करता येईल.

# विवक्षित प्रकरणात माहिती देण्यास नकार देणे.

- एखाद्या माहिती पुरवण्याच्या विनंतीमुळे जर राज्याव्यतीरीक्त अन्य एखाद्या व्यक्तिच्या कॉपी राईटचे उल्लंघन होत असेल तर अशी माहिती कलम ८ च्या तरतूदीन बाधा येवू न देतर नाकारता येईल.

- कलम ११ नुसार त्रयस्थ पक्षाची माहिती उघड करण्यापुर्वी माहिती उघड करावी किंवा करू नये या बाबत नोटीस प्रयस्त पक्षास द्यावी व १० दिवसात अभिवेदन करण्यास सांगावे.

# शास्ती

- कलम २० नुसार जनमाहिती अधिका-याने वाजवी कारणाशिवाय अर्ज स्विकारण्यास नकार दिला किंवा वेळेवर माहिती दिली नाही किंवा दुष्ठ हेतूने माहिती नाकारली किंवा जाणून बुजून दिशाभुल, चुकीची माहिती दिली, किंवा माहिती देण्यात अडथळा आणला तर प्रतीदिनी रुपये २५०/- किमान २५,०००/- रुपये शास्ती लावता येईल.

- तदपुर्वी त्यांचे म्हणणे एकूण घेण्यात येईल.
- जवाबदार कर्मचा-या विरूध्द शिस्त भंगाची कारवाई करता येईल
- अशा आदेशाविरूध्द लोक आयूक्त/उप लोक आयूक्त यांच्याकडे अपील करता येईल (सा. प्र. वि. शासनि क्रमांक ममाअ-२००५/प्र. क्र. ०२/०५/५ दिनांक ३१/०३/२००५)

# अधिसूचना

## क्रमांक सी. आर. टी. आय. २००५/सी. आर. २६५/०५/५, दिनांक ११ ऑक्टोंबर, २००५.-

- माहितीचा अधिकार अधिनियम, २००५(२००५ चा २२) याच्या कलम २४ चे उप-कलम (४) अनुसार प्राप्त अधिका-यांचा वापर करून महाराष्ट्र शासन असा खुलासा करीत आहे की, पुढील गुप्तवार्ता व संरक्षण संघटनांना (महाराष्ट्र शासनाने स्थापन केलेल्या) सदर अधिनियमामधील तरतूदी लागू होणार नाहीत:-

१. राज्य गुप्तवार्ता आणि तिच्या सहायक शाखा,
२. सर्व पोलीस अयुक्तालयाच्या ‘विशेष शाखा’,
३. सर्व जिल्ह्यातील सर्व जिल्हा पोलीस अधिक्षकांच्या जिल्हा ‘विशेष शाखा’

# सदभावनेने केलेल्या कृतीला संरक्षण

- या अधिनियमान्वये किंवा त्याखाली केलेल्या कोणत्याही नियमान्वये सदभावनेने केलेल्या किंवा करण्याचे अभिप्रेत असलेल्या कोणत्याही गोष्टीबद्दल, कोणत्याही व्यक्तीविरुध्द कोणताही दावा, खटला किंवा अन्य कायदेशीर कार्यवाही दाखल करण्यात येणार नाही.

# टिप

- एखद्या माहिती अधिका-याची माहिती नाकारण्यामागे काहीतरी भुमिका असू शकते. उदाहरणार्थ, दिलेल्या माहितीमुळे अमुक एका व्यक्तीच्या खाजगी जिवनावर त्याचा वाईट परिनाम होईल आणि ती माहिती देऊनसुध्दा व्यापक जनहित साध्य होणार नाही, अशी त्या माहिती अधिका-याची खात्री होईल किंवा अमुक एक प्रकाराची माहिती 'गोपनीय' आहे असे त्या माहिती अधिका-याचे स्वत:चे मत होईल. त्याचे हे जे मत असते. त्याला त्या परिस्थितीचे 'त्याने केलेले मूल्यमापन' (हिज ओन जजमेंट) म्हणतात.

- व्यक्तीव्यक्तीच्या आकलनानुसार ते मुल्यमापन वेगवेगळे असू शकते. त्यामूळे अशी माहिती नाकारण्यामागे प्रत्येक वेळच त्याचा अंत:स्थ हेतू दुष्ट वा गैर होता असे लगेच म्हणता येणार नाही. ते सिध्द करावे लागेल,. ते सिध्द झाले नाही, तर त्याचे मुल्यमापन ‘चुकले’ असे फार फार तर समजले जाईल. त्यामूळे त्या कृतीला ‘गुन्हा’ न समजता केवल ‘चुक’ असे समजले जाईल. यालाच ‘सदभावनाने केलेल्या कृतीबाबत (ॲक्शन इन गुड फेथ) कायद्याने दिलेले संरक्षण’ म्हणतात.

# कालमर्यादा

| अ.क्र. | परिस्थिती | अर्ज निकालात काढण्यासाठीची कालमर्यादा |
| --- | --- | --- |
| १. | सर्वसाधारण परीस्थितीत माहिती पुरविणे | ३० दिवसाच्या आत |
| २. | जर माहिती, एखाद्या व्याक्तिचे जीवीत व स्वतंत्र्य यांच्याशी संबंधीत असेल तर, माहिती पुरविणे. | ४८ तासांच्या आत |
| ३. | सहायक शासकीय माहिती अधिका-यामार्फत अर्ज स्विकारला असेल तर माहिती पुरविणे. | अनुक्रमांक १ व २ मध्ये दर्शवलेल्या कालमर्यादेत ५ दिवस जादा दाखल करण्यात येईल. |
| ४. | अनय सार्वजनिक प्राधिकरणाकडून हस्तांतरित केल्यानंतर अर्ज/मागणी मिळाली असेल तर, माहिती पुरवणे<br>(अ) सर्वसाधारण परिस्थितीत | (अ) संबंधित सार्वजनिक प्राधिकरणास अर्ज मिळाल्यापासून ३० दिवसांच्या आत |
| | (ब) जर माहिती, एखाद्या व्यक्तीचे जीवीत व स्वतंत्र्य यांच्याशी संबंधीत असेल तर | (ब) संबंधित सार्वजनिक प्राधिकरणास अर्ज मिळाल्यापासून ४८ तासांच्या आत. |

| अ.क्र. | परिस्थिती | अर्ज निकालात काढण्यासाठीची कालमर्यादा |
|---|---|---|
| ५. | दस-या अनुसूचीमध्ये विनिर्दिष्ट केलेल्या संघटनेद्वारे माहिती पुरविणे.<br>(अ) जर माहिती, मनवी हक्कांच्या उल्लंघनाच्या अरोपांच्या संबंधातील असेल तर | (अ) अर्ज मिळाल्यापासून ४५ दिवसाच्या आत |
| | (ब) जर माहिती भ्रष्टाचाराच्या आरोपाच्या संबंधातील असेल तर | (ब) अर्ज मिळाल्यापासून ३० दिवसांच्या आत |
| ६. | जर माहिती त्रयस्थ पक्षाशी संबंधीत असेल व त्रयस्थ पक्षाने, ती गोपनीय म्हणून समजली असेल तर, माहिती पुरविणे. | या दस्ताऐवजाच्या परिच्छेद २३ ते २८ मध्ये दिलेल्या कार्यपध्दतीचे अनुपालन केल्यानंतर पुरविण्यात यावी. |
| ७. | जेव्हा अर्जदारास अतिरिक्त शुल्क प्रदान करण्यास सांगण्यात आले असेल तेव्हा. माहिती पुरविणे | अर्जदारास, अतिरिक्त शुल्काबाबत कळविणा-या आणि अर्जदाराने शुल्काचे प्रदान केल्याच्या दरम्यानच्या कालावधी, उत्तर वगळण्यात यंईल. |

# स्वत:शीच संबंधीत माहिती अर्ज वा अपील अर्ज निकाली न काढण्याबाबत

1. अर्जदार यांच्या कडून माहितीचा अधिकार अधिनियम 2005 अंतर्गत काही वेळा संबंधित जन माहिती अधिकाऱ्याची वा प्रथम अपील अधिकाऱ्याची वैयक्तिक माहिती मागविली जाते.

2. वैयक्तिक स्वरूपाची माहिती उपलब्ध न झाल्यास प्रथम अपील केले जाते.

3. अशा प्रकारच्या अर्जाच्या बाबतीत स्वत: निर्णय घेवू नये. (No man can be a Judge in his own cause)

4. अशा प्रकरणी सार्वजनीक प्रधिकरणाने अन्य जन माहिती अधिकारी वा अपील अधिकारी यांची त्या विनिर्दीष्ट प्रकरणी नियुक्ती करावी.

*(महाराष्ट्र शासन, साप्रवि, शासन परिपत्रक क्र. संकिर्ण क्र.-2016/प्र.क्र. (155/16) सहा. दिनांक 07/09/2016.)*

# म. शा., साप्रवि, परिपत्रक क्र. संकिर्ण 2016/प्र.क्र. (140/16/सहा, दि. 07/09/2016)

# जन माहिती अधिकारी यांनी ठेवावयाचे रजिस्टर

| अ.क्र. | अर्जाचा नोंदणी क्रमांक | अर्जदाराचे नाव व पत्ता | कोणा कडे अर्ज केला आहे? मा.अ. /स.मा .अ | अर्ज प्राप्त झाल्याचा दिनांक | माहिती पुरविण् याची शेवटची तारीख | अर्जदार दारिद्र रेषेखालील आहे काय | माहितीचा थोडक्यात तपशील | मागीतलेल्या माहितीचे स्वरूप (फॉर्म), प्रती मागणे/तपासणी/ नमुना/इलेक्ट्रॉनिक माहिती | त्रयस्थ पक्षाची माहिती आहे काय? | अर्जा चे शुल्क रूपये | अर्जाची विहित फी भरल्याचा दिनांक |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १. | २. | ३. | ४. | ५. | ६. | ७. | ८. | ९. | १०. | ११. | १२. |
| | | | | | | | | | | | |
| माहिती शुल्क कळविल्याचा दिनांक | माहिती शुल्क भरण्याचे स्वरूप व दिनांक | माहितीचे शुल्क further fees | माहिती शुल्क दिल्या पासून माहिती देण्यासाठी शिल्लक दिवस. | माहिती दिल्याचा दिनांक | माहिती कशाने पाठविली की व्यक्ती श:नेली . | माहिती कोणत्या स्वरूपात दिली. | पृथक्करणीय माहिती त्रयस्थ पक्षाची माहिती आहे का ? | माहिती नाकारली काय? | कोणत्या कलमाच्या आधारे नाकारली? | प्रथम अपील झाले आहे का? | शेरा. |
| १३. | १४. | १५. | १६. | १७. | १८. | १९. | २०. | २१. | २२. | २३. | २४. |

# जन माहिती अधिकारी यांनी प्रत्येक महिन्याच्या शेवटी काढावयाची समरीचे रजिस्टर

| आधीच्या महिन्यातील प्रलंबीत असलेल्या माहिती अर्जांची संख्या | त्या महिन्यात प्राप्त झालेल्या माहिती अर्जांची संख्या | एकूण | त्या महिन्यात निकाली काढलेल्या माहिती अर्जांची संख्या | प्रलंबीत असलेल्या माहिती अर्जांची संख्या | शेरा |
|---|---|---|---|---|---|
| १. | २. | ३. | ४. | ५. | ६ |

# अपीलार्थ अधिकारी यांनी ठेवावयाची नोंदवही

वर्ष:

विभागाचे नाव:

सार्वजनिक प्राधिकरणाचे नाव:

पदनाम:

अपीलीय अधिकाऱ्याचे नाव:

| अ.क्र. | अपील अर्जाचा नोंदणी क्रमांक | अपील काराचे नाव व पत्ता | अपील अर्ज कोणाकडे केला आहे? स.मा.अ/ अपील प्राधिकारी | अपील अर्ज प्राप्त झाल्याचा दिनांक | प्रतिवादी याचे नाव व पत्ता. | अपीलार्थी दारिद्र रेषेखालील आहे काय | अपीलाचा थोडक्यात तपशील | अपील अर्जाचे शुल्क कोणत्या स्वरूपात भरले. | अपील अर्जाचे विहित शुल्क भररल्याचा दिनांक. | कोणत्या जनमाहिती अधिकाऱ्याविरूध्द अपील केले त्याचा तपशील. | अपीला वर निर्णय दिल्याचा दिनांक | शेरा. |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १. | २. | ३. | ४. | ५. | ६. | ७. | ८. | ९. | १०. | ११. | १२. | १३. |

# महिन्याच्या आखेरीस काढावयाची समरी.

| आधीच्या महिन्यातील प्रलंबीत असलेल्या अपील अर्जांची संख्या | त्या महिन्यात प्राप्त झालेल्या अपील अर्जांची संख्या | एकूण | त्या महिन्यात निकाली काढलेल्या अपील अर्जांची संख्या | प्रलंबीत असलेल्या अपील अर्जांची संख्या | शेरा |
|---|---|---|---|---|---|
| १. | २. | ३. | ४. | ५. | ६ |

# धन्यवाद...!

